# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप-प्रादेशिक कार्यालय,
दुसरा मजला, फुलचंद प्लाझा,
धुळे-४२४००१
फोन नं. ०२५६२-२७३७३१

जा.क्र.मप्रनिम/उपाकाधु/६३७ /२०१९ दिनांक : २५ / ०६ /२०१९

प्रति,
**मा. जिल्हाधीकारी साहेब,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,**
**नंदुरबार**

**विषय**:- स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना करणे बाबतचे प्रारूप
**संदर्भ**:- १) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८.

महोदय,

वरिल संदर्भीय विषयान्वये महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग यांनी घेतलेल्या शासन निर्णयानुसार व मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्यातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Force**) ची स्थापना प्रदूषण पट्टे असलेल्या जिल्हयाची करावयाची असल्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यानुसार कृती दलाच्या समिती सदस्यांमध्ये बैठका घेणे व निर्णयाची अंमलबजावणी करणे याबाबतची जबाबदारी जिल्हास्तरावरील संबंधीत विभागीय अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे आहे.

वरिल नमुद केलेल्या दलाची स्थापना करणे बाबतची प्रारूप टिपणी व मसुदा आपल्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सविनय सादर करत आहे

आपली विश्वासू

सोबत :- वरील प्रमाणे.

**(सौजन्या सु. पाटील)**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, धुळे.
तथा
प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, नाशिक यांचे प्रतिनिधी,

प्रत माहीती स्तव सविनय सादर :-
प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, नाशिक.

## प्रारूप टिपणी

सविनय सादर,

**विषय**:- स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना करणे बाबत
**संदर्भ**:- १) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३
दि. १३/१२/२०१८.

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयानूंषगाने व संदर्भास अनूसरुन महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाचा शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८. अन्वये प्रदूषीत नदीपट्यातील प्रदूषण रोखण्याकरिता नंदुरबार जिल्ह्यासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची **(Special Environment Surveillance Task Force)** ची स्थापना प्रदूषीत पटटे असलेल्या नंदूरबार जिल्हयामध्ये करावयाची आहे. उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे समितीची रचना खालील प्रमाणे करावयाचे प्रस्तावीत आहे.

| अ.क्र | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १ | मा जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी |
| २ | जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी |
| ३ | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, नाशिक किंवा त्यांचे प्रतिनिधी |
| ४ | विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी. |

नदीच्या प्रदूषित पटटयामध्ये वाळू उत्खनन होणार नाही याची खबरदारी सदर सनियंत्रण दलाने घावयाची आहे. उपरोक्त समितीच्या सदस्यांमध्ये समन्वये साधणे. बैठकांचे आयोजन करणे व निर्णयांची अंमलबजावणी करणे इत्यादी बाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची राहील. असे शासन निर्णय क्रमांक: NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८ या मध्ये नमुद केलेले आहे.

वरील प्रमाणे स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना करणे बाबतचे प्रारूप मान्यतेसाठी सविनय सादर करण्यात येत आहे. तसेच सदर विषयाची व्याप्ती पाहता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाचे कामकाज प्रभावी पणे पार पाडण्यासाठी समंधित विभागाच्या खाते प्रमुखांना सुद्धा समाविष्ट करणे आवश्यक वाटते.

सदर विषय नगर परिषदा तसेच खनिकर्म विभागा यांच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे या विभागाच्या खाते प्रमुखांचा समावेश विशेष आमंत्रित सदस्य म्हणून करण्यासाठी दि. २१/०६/२०१९ रोजी मा. आदरणीय जिल्हाधिकारी साहेब नंदूरबार, यांच्याशी चर्चा करण्यात आली असून यांनी तोंडी आदेशीत केल्यानुसार खालील नमुद केलेल्या विभाग प्रमुख यांची विषेश आंमत्रित सदस्य म्हणून स्वतंत्र पर्यावरण सहनियंत्रण दल यामध्ये समाविष्ठ करण्यासाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

१. मुख्याधिकारी शहादा नगर परिषद शहादा : विशेष आमंत्रित सदस्य
२. मुख्याधिकारी तळोदा नगर परिषद तळोदा : विशेष आमंत्रित सदस्य
३. मुख्याधिकारी नवापूर नगर परिषद नवापूर : विशेष आमंत्रित सदस्य
४ जिल्हा खनिकर्म आधिकारी नंदुरबार : विशेष आमंत्रित सदस्य

सदर वरील प्रस्ताव आपल्या मान्यता प्राप्त झाल्यावर आदेशाचे प्रारूप सादर करण्यात येईल.
प्रस्ताव मान्यते साठी व योग्यत्या मार्गदर्शनासाठी सविनय सादर.

आपली विश्वासू ,

**(सौजन्या सु. पाटील)**
उप-प्रादेशिकअधिकारी, म.प्र.नि. मंडळ, धुळे.
तथा
प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ,नाशिक यांचे प्रतिनिधी

**मा. जिल्हाधीकारी :**

Balaji D
24/6/19

**संदर्भ**:- १) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८.

---

जा.क्र. मप्रतिमं/उप्राकाधु/४३४/२०१९ दि० २४/०६/२०१९

आदेश,

उपरोक्त संदर्भास अनुसरून महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाचा शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८. अन्वये प्रदूषीत नदीपट्यातील प्रदूषण रोखण्याकरिता नंदुरबार जिल्ह्यासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची **(Special Environment Surveillance Task Force)** ची स्थापना प्रदूषीत पटटे असलेल्या नंदूरबार जिल्हयामध्ये करावयाची आहे. उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे समितीची रचना खालील प्रमाणे करावयाचे प्रस्तावीत आहे.

स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल **(Special Environment Surveillance Task Force)** — जि. नंदूरबार.

| अ.क्र | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १ | मा जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी |
| २ | जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी |
| ३ | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, नाशिक किंवा त्यांचे प्रतिनिधी |
| ४ | विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी. |

विषेश आंमत्रित सदस्य स्वतंत्र पर्यावरण सहनियंत्रण दल जि. नंदूरबार.

१. मुख्याधिकारी शहादा नगर परिषद शहादा : विशेष आमंत्रित सदस्य
२. मुख्याधिकारी तळोदा नगर परिषद तळोदा : विशेष आमंत्रित सदस्य
३. मुख्याधिकारी नवापूर नगर परिषद नवापूर : विशेष आमंत्रित सदस्य
४ जिल्हा खनिकर्म आधिकारी नंदुरबार : विशेष आमंत्रित सदस्य

उक्त दर्शवीलेल्या प्रमाणे सदर स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल **(Special Environment Surveillance Task Force)** नंदूरबार या आदेशाच्या दिनांका पासून कार्यान्वीत राहील. सदर स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल हे नंदूरबार जिल्हयातील प्रदूषित नदी पटटयातील प्रदूषण रोखण्याकरीता गठीत करण्यात आलेले आहे.

Balaji DM 24/6

जिल्हाधीकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदूरबार

प्रतिलिपी — माहितीस्तव सादर.

१) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग, मंत्रालय, नवी प्रशासन भवन, १५ वा मजला, मादामकामा मार्ग मुंबई- ३२
२) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक.
३) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन,
४) संचालक (पर्यावरण )
५) संचालक (नगरविकास)
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदूरबार.
७) सर्व नगर परिषदा/ ग्रामपंचायत/ मुख्याधिकारी.